CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ७ डिसेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ६८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## कुर्ला एक्सप्रेसचे इंजीन बिघडले, तासभर रेल्वे वाहतूक विस्कळीत



**कुर्डूवाडी** : सोलापूरहून पुण्याकडे जाणारी कोईमतूर-मुंबई कुर्ला एक्सप्रेसच्या इंजीनमध्ये बिघाड झाले. त्यामुळे तासभर रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळै प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त केली. बुधवार, दि. ६ डिसेंबर रोजी नऊ वाजताच्या सुमारास जिंती- भिगवणदरम्यान कुर्ला एक्सप्रेसचे इंजिन बंद पड्ले.

पाठीमागून येणाऱ्या एक्सप्रेस गाड्या, सोलापूरहून पुण्याकडे जाणारी इंटरसिटी एक्सप्रेस सुमारे एक तास जिंती रोड स्थानकावर तर बंगळुरू- नवी दिल्ली के.के. एक्सप्रेस तब्बल पन्नास मिनिटे पारेवाडी स्थानकावर थांबविण्यात आली होती. दौंड येथून दुसरी इंजीन आल्यानंतर ते बदलण्यात आले. त्यानंतर सकाळी १०.१२ वाजता कुर्ला एक्सप्रेस गाडी मुंबईकडे मार्गस्थ झाली. त्यानंतर रेल्वे वाहतूकही सुरळीत झाली. रविवार, दि. ३ डिसेंबर रोजी इंद्रायणी एक्सप्रेसचे जिंती रोड येथील रेल्वेस्टेशनदरम्यान इंजीन बंद पडल्याने दीड तास गाडी उशीराने धावली. त्यामुळे अनेक प्रवाशांचे पुढील नियोजन बिघडले. प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. रेल्वे गाड्यांचे इंजीन बंद पडण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने प्रवाशांतून नाराजी व्यक्त होत आहे.

## पापाचा पैसा सुखाचा वाटला

# माजी शिक्षणाधिकाऱ्याला अखेर खड्ड्यात घातला

### किरण लोहार यांच्याकडे सापडली पावणेसहा कोटींची अवैध संपत्ती

**सुराज्य/सोलापूर**

**पापाचा पैसा सुखाचा वाटतो, पण कधी कधी खड्ड्यातही घालतो, अशी एक म्हण अति पैशाच्या हव्यासाविषयी सांगितली जाते. अशीच एक आफत सोलापूर जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षणाधिकाऱ्यावर आली आहे.काही वर्षांपूर्वी ज्यांची कारकिर्द अत्यंत काळीकुट्ट ठरली, त्या किरण लोहार यांच्यावर अवैध (अपसंपदा) संपत्तीप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक(एसीबी) खात्याने गुन्हा दाखल केल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ माजली आहे. त्यांच्या अवैध संपत्तीचा आकडा डोळे गरगरायला लावणारा आहे. एक दोन नव्हे तर तब्बल पावणे सहा कोटींची ही संपत्ती असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. लोहार यांच्या पापाचे धनी पत्नी आणि मुलगाही ठरले आहेत. त्यामुळे त्यांच्यावरही गुन्हा दाखल झाला आहे.**

सोलापूर जिल्हा परिषदेतील तत्कालीन प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्या कुटुंबीयांकडे भ्रष्ट मार्गाने कमावलेली सुमारे सहा कोटी रूपयांची मालमत्ता उघडकीस आली असून याप्रकरणी लोहार यांच्यासह त्यांच्या पत्नी व मुलाविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल झाला आहे.

लोहार यांना उत्तर सोलापूर तालुक्यातील एका शिक्षण संस्थाचालकाकडून २५ हजार रूपयांची लाच घेताना रंगेहात पकडले होते.त्यानंतर लोहार यांच्या मागे एक ना अनेक संकटे मागे लागली.

एसीबीने लोहार व त्यांच्या कुटुंबीयांनी कमावलेल्या मालमत्तेची खुली चौकशी केली असता दि. १५ नोव्हेंबर १९९३ ते दि. ३१ आक्टोंबर २०२२ या निरीक्षण कालावधीत लोहार कुटुंबीयांकडे कायदेशीर ज्ञात मालमत्तेपेक्षा ११२ टक्के जास्त भ्रष्ट व अवैध मार्गाने मिळविलेली मालमत्ता आढळून आली. एकूण पाच कोटी ८५ लाख ८५ हजार ६२३ रूपयांची ही अवैध मालमत्ता आहे. यात शिक्षणाधिकारी किरण लोहार (वय ५०) यांना त्यांच्या पत्नी सुजाता (वय ४४) आणि मुलगा निखिल (वय २५, तिघे रा. आकांक्षा शिक्षक कॉलनी, पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) यांनी गैरमार्गाने प्रोत्साहन दिले आणि मदत केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सोलापूर कार्यालयातील पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

सहायक पोलीस आयुक्त गणेश कुंभार हे पुढील तपास करीत आहेत.



### बाराच्या भावात गेले

वादग्रस्त आणि लाचखोर शिक्षणाधिकारी लोहार यांचे अख्खे कुटुंब बाराच्या भावात गेले आहे. अपसंपदा गोळा केल्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लोहार, त्याची पत्नी आणि मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही अपसंपदा गोळा करताना पत्नी सुजाता किरण लोहार व मुलगा निखिल किरण लोहार यांनी लोकसेवक किरण लोहार यांना भ्रष्ट मार्गाने अपसंपदा संपादित करण्यास अपप्रेरणा व सहाय्य केले असल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे. अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. जानवे-खराडे, पोलीस उपअधीक्षक कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली आहे.

### शिक्षक ते शिक्षणाधिकारी

कोल्हापूर जिल्ह्यात एका झेडपीच्याच शाळेत त्यांनी शिक्षक म्हणून त्यांनी शासकीय नौकरीला सुरूवात केली.स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर शिक्षण विभागात ते रूजू झाले. सप्टेंबर २०१८ मध्ये शिक्षण आयुक्त कार्यालयाने त्यांच्यावर कारवाई करताना माध्यमिक शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक या दोन्हीपदांवरून कार्यमुक्त केले होते.

### सीईओंची भेट झाली नाही

याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता जिल्हा परिषदेच्या सीईओ मनिषा आव्हाळे यांची भेट होऊ शकली नाही. जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये शिक्षणाधिकारी किरण लोहार यांच्यावर गुन्हा नोंद झाल्याची चर्चा होत असताना दुपारी चारच्या सुमारास मनिषा आव्हाळे या त्यांच्या स्वतः च्या कार्यालयामध्ये न जात त्या थेट प्राथमिक विभागातील शिक्षण अधिकाऱ्यांच्या चेंबरमध्ये गेल्या. त्यांच्यासमवेत प्रशासन अधिकारी स्मिता पाटील, प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी मिरकुले आणि कर्मचाऱ्यांमध्ये तब्बल दोन तास प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांच्या चेंबरमध्ये चौकशी सुरू होती. यावेळी पत्रकारांनी संबंधित विषयाची माहिती घेण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर उभे होते. मात्र त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळू शकली नाही.

**आयुक्तांचा उठाव :** राज्याचे शिक्षण खाते भ्रष्टाचाराने बरबटले आहे. राज्यातील ३६ शिक्षण अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे पत्र शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी काही महिन्यांपूर्वी एसीबीला लिहिले होते. शिक्षण विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू असल्याने आयुक्तांनी या पत्रात म्हटले होते. शिक्षण विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. अधिकारी लाच घेताना पकडले जातात मात्र पुन्हा सेवेत येतात, पुन्हा भ्रष्टाचार करतात पण कारवाई होत नाही. ज्या शिक्षकांवर छापे पडले त्यांची खुली चौकशी करण्याची मागणी मांढरे यांनी केली.

### भ्रष्टाचाराचे दर पत्रक

- कायम मुख्याध्यापक मान्यतेसाठी : एक ते दीड लाख रुपये
- शालार्थ प्रकरणांसाठी : ८० हजार ते एक लाख रुपये
- मेडिकल बिल मंजुरीसाठी रकमेच्या पाच ते २० टक्क्यांपर्यंत
- शिक्षक बदलीसाठी : ५० हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत

सरकारी कार्यालये, पोलिस स्थानकात भ्रष्टाचार चालतोच पिढी घडवण्याचे काम शिक्षक करत असतो त्या शिक्षण क्षेत्रात देखील भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. गेल्या काही वर्षात एसीबीने उघड केलेली प्रकरणे पाहता भ्रष्टाचाराचा हा चढता आलेख चिंता वाढवणरा आहे.

### भ्रष्टाचाराचे दर पत्रक

- कायम मुख्याध्यापक मान्यतेसाठी : एक ते दीड लाख रुपये
- शालार्थ प्रकरणांसाठी : ८० हजार ते एक लाख रुपये
- मेडिकल बिल मंजुरीसाठी रकमेच्या पाच ते २० टक्क्यांपर्यंत
- शिक्षक बदलीसाठी : ५० हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत

सरकारी कार्यालये, पोलिस स्थानकात भ्रष्टाचार चालतोच पिढी घडवण्याचे काम शिक्षक करत असतो त्या शिक्षण क्षेत्रात देखील भ्रष्टाचाराची कीड लागली आहे. गेल्या काही वर्षात एसीबीने उघड केलेली प्रकरणे पाहता भ्रष्टाचाराचा हा चढता आलेख चिंता वाढवणरा आहे.

### २५ हजारांची लाच महागात

उत्तर सोलापूर तालुक्यातील एका खाजगी शाळेला १० पर्यंत मान्यता देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच प्राथमिक शिक्षण अधिकारी किरण लोहार यांनी मागितली होती. तडजोडी अंती २५ हजार रुपये ठरले होते. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास २५ हजार रुपये घेताना ते एसीबीच्या जाळ्यात अडकले.

### राज्यातील तीन लाचखोर शिक्षणाधिकाऱ्यांना एकाचवेळी दणका

राज्यातील तीन लाचखोर शिक्षणाधिकाऱ्यांना पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तगडा झटका दिला आहे. बेहिशेबी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जमविल्याप्रकरणी तीन शिक्षणाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.लाचखोरी करत शिक्षण क्षेत्राला कलंक लावलेल्या माजी शिक्षणाधिकारी असलेल्या किरण लोहार, तुकाराम सुपे आणि विष्णू कांबळे विरोधात पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

## दोन कोटी रुपयांचे कर्ज देतो म्हणून हॉटेल चालकास १४ लाखास गंडविले

**माळशिरस** : आपले तिरुपती येथील तिरूमला बालाजी ट्रस्टच्या मंदिरात पूजेचे वस्तू पुरवण्याचे कंत्राट आहे. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून तुम्हाला हॉटेलच्या नूतनीकरणासाठी दोन कोटी रुपयांचे कर्ज देतो अशी थाप मारून एका हॉटेल व्यावसायिकास १४ लाख रुपयांची फसवणूक केली.

ही घटना माळशिरस येथे घडली. या प्रकरणात पोलिसांनी एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अंबादास सायबू ओरसे, त्याची पत्नी मालती ओरसे, मुलगा शिवतेज अंबादास ओरसे (राऊतनगर, अकलूज) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. यासंदर्भात शंकरराव देशमुख (माळशिरस) यांनी पोलिसात फिर्याद दिली.



त्यांचे माळशिरस येथे शेती आणि मेरोडियन नावाचे हॉटेल आहे. आरोपी अंबादास ओरसे हा आपण तिरुपती येथील बालाजी मंदिरात पूजेचे साहित्य सप्लाय करतो. त्यातून तीन हजार कोटी रुपये मिळणार आहेत. त्यातून तुम्हाला दोन कोटी रुपये कर्ज देतो, असे तिघांनी त्याने सांगितले. या कामासाठी १४ लाख रुपये लागतील, असे सांगून तिघांनी देशमुख यांच्याकडून १४ लाख रुपये ॲडव्हान्स दि. ७ ऑगस्ट २०२१ रोजी घेतली होती. त्यानंतर कर्ज किंवा घेतलेले पैसे परत दिले नव्हते. फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर देशमुख यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. तपास सहाय्यक फौजदार रणदिवे करीत आहेत.

## अशोक चौकातील रेशन दुकानात धान्याचा काळाबाजार

### परवान रद्द करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर** : अन्नधान्य वितरण प्रणालीच्या माध्यमातून गोरगरिबांना दोन घास तोंडात जावा म्हणून शासनाकडून मोफत धान्याचा पुरवठा केला जातो. रेशन दुकानदारांच्या माध्यमातून हे धान्य वाटप केले जाते. रेशन दुकानदार शासनाच्या या उदात्त हेतूला काळीमा फासण्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून चालू असल्याचा असाच काहीसा प्रकार अशोक



चौकातील अ परिमंडल विभागातील दुकान नंबर-१६ मध्ये निदर्शनास आला आहे.

या दुकानातून शासकीय धान्य काळा बाजारात जात असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन दुकानदारावर फौजदारी कारवाई करावी अशी मागणी तक्रार यांनी केली आहे.

रेशन दुकानदार सध्या हायटेक होत आहेत. ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून यंत्रणा अपडेट होत असताना काही दुकानदार मात्र गोरगरीब जनतेच्या तोंडातील घास काढून घेऊन आपले ते धान्य काळा बाजार जादा दरांने विकत आहेत. खिसे गरम करण्याचा उद्योग करत आहेत. अशोक चौकातील दुकान नंबर-१६ मध्ये असाच प्रकार बुधवारी निदर्शनास आला. तक्रारदारांनी सदरच्या दुकानातून धान्याची पोतीच्या पोती बाहेर जात असताना व्हिडिओ, काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. त्यामुळे रेशन दुकानदारांचे खरे रूप समोर आले. दुकानदारांच्या या कृतीमुळे सर्व दुकानदार बदनाम होत असून, या दुकानदारावर फौजदारी कारवाई करून दुकानाचा परवाना रद्द करावा, अशी मागणीदेखील तक्रारदार यांनी केली आहे.

> हक्काचा शिधा वेळेवर न देणे, धान्य कमी देणे, मनमानी करणे. वृद्धांना, महिलांना दादागिरीची भाषा करून धान्य न देता परत पाठवणे, पॉशम शीन बिघडण्याचा बहाणा करून धान्याचा स्टॉक इतर गोडाऊनमध्ये हलवत धान्याचा काळाबाजार गेली सहा महिन्यापासून चालू आहे.
>
> **– अब्दुल पठाण (तक्रारदार)**

> या संदर्भातील तक्रार आपल्यास प्राप्त झाली आहे. एसआय आणि झोन अधिकारी यांना दुकान तपासणीचे आदेश दिले आहेत. दोषी आढळ्यास कारवाई करू.
>
> **– सुमित शिंदे ( अन्नधान्य वितरण अधिकारी)**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




**कर्जबुडव्यानी तुम्हाला चुना लावलेला चालतो, अन् आम्हाला चकरा मारायला लावता !**

कल्याण
256-35-447

मुंबई
480-28-350

## विरोधकांसाठी आता सुपारी पान ठेवू

### देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल

### आजपासून नागपूर हिवाळी अधिवेशनाला सुरुवात

**सुराज्य/नागपूर**

राज्याच्या हिवाळी अधिवेशनाला गुरूवार दि.७ डिसेंबरपासून सुरूवात होणार आहे.नेहमीप्रमाणे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांच्या अधिवेशन पूर्वसंध्येच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. त्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. विरोधकांना चहापान नको असेल तर यापुढे पान-सुपारीचा कार्यक्रम ठेवू,अशी मिश्किल टिपणी त्यांनी केल्यानंतर पत्रकार परिषदेत एकच हशा उडाला.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. यावेळी फडणवीस यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. विरोधकांनी चहापानावर बहिष्कार टाकला. विरोधकांसाठी आता सुपारी पान ठेवायला हवे,म्हणजे कदाचित ते येतील अशी शक्यता मला दिसते,असे फडणवीस म्हणाले.



गेल्या काही दिवसांपासून चक्रीवादळामुळे देशाच्या विविध भागात पाऊस होत आहे. त्यामुळे हवामान विभागाने महाराष्ट्रातही पावसाची शक्यता ही त्या ठिकाणी वर्तवण्यात आली आहे आणि जवळपास पाच जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देखील या ठिकाणी सांगण्यात आलेला आहे. आजच मुख्यमंत्री महोदयांनी सर्व यंत्रणेला अलर्ट राहण्याचा सल्ला दिलेला आहे. त्यासोबत ज्या ज्या ठिकाणी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झालंय किंवा होतंय. त्याठिकाणी कुठली वाट न पाहता पंचनामे करून जी काही नुकसान भरपाई आहे, त्या संदर्भात राज्य सरकारकडे मागणी करण्याच्या संदर्भात देखील , मुख्यमंत्र्यांनी आज प्रशासनाला निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले.

विरोधी पक्ष नेते बोलले बाकीचे नेते बोलले की महाराष्ट्र हा दुसरा क्राईममध्ये ही वस्तुस्थिती नाहीये. लोकसंख्येचा विचार केला तर आपण देशामध्ये आठव्या क्रमांकावर आहोत. आठव्या क्रमांकावर आहोत हे सुद्धा भूषणावह नाही. आपण जर गुन्ह्याचा विचार केला हत्या हा अतिशय महत्त्वपूर्ण गुन्हा मानला जातो तर त्यात महाराष्ट्र सतराव्या क्रमांकावर आहे,असेही ते म्हणाले.

सत्तारूढ पक्ष सर्व प्रकारच्या चर्चा करता आम्ही तयार आहोत. आम्हाला असं वाटतं की सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. याचं कारण शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, आरक्षणाचे प्रश्न आहेत, या सगळ्या प्रश्नांवर सकारात्मकतेने जाण्याकरता माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वामध्ये आमचा सत्तारूढ पक्ष हा पूर्णपणे तयारी मध्ये आहे.

**■ ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरण**

ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरणावरून सरकारला जाब विचारला जाणार आहे. ड्रग्ज माफिया ललित पाटील प्रकरण सुद्धा गृह विभाग आणि आरोग्य विभागाला ठाकरे गटातून घेरण्याचा प्रयत्न होणार करण्यात येणार आहे.

**■ ठाकरेंचा अधिवेशनादरम्यान सहभाग**

उद्धव ठाकरे हे ११ किंवा १२ डिसेंबर दरम्यान नागपुरात अधिवेशनासाठी उपस्थित राहणार आहेत. तर आदित्य ठाकरे हिवाळी अधिवेशनात पूर्णपणे सहभागी राहून सरकारला या अशा अनेक प्रश्नांवर जाब विचारणार आहे. तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी समूहाकडून केला जाणार असल्याने या निर्णयाला कडाडून विरोध सभागृहात सुद्धा ठाकरे गटाकडून केला जाईल.

CMYK